Secondary Education Society's

# Arts and Science College, Bhalod
# Taluka-Yawal, Dist- Jalgaon

**E-mail: ascbhalod@gmail.com, Web: ascbhalod.ac.in. Ph.Office: +91-02585- 242229. 425304**
**NAAC Reaccredited "B" Grade**
**Fax: +91-02585-242411**

## 7.1.8 Institutional efforts/initiatives in providing an inclusive environment i.e., tolerance and harmony towards cultural, regional, linguistic, communal socioeconomic and other diversities






तायडे ह्यांच्या गझलांनी आणि कवितांनी विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. जगणे माझे आर.आर.पाटील, ।.तुकाराम मार,प्रा. प्रा. हे स्वप्नील पाटील आणि वैष्णवी खराट ह्यांनी

**दिनांक.१४/०३/२०२२ देशदूत**

# भालोद महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा

▸▸ भालोद, ता.यावल । वार्ताहर



सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित, कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी विकास विभाग व युवती सभा यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. वर्षा नेहेते या होत्या. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भालोद गावाचे सरपंच प्रदिपदादा कोळी हे होते. महाविद्यालयातील विद्यार्थी विकास महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. मोहिनी तायडे यांचे जागतिक महिला दिन या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन डॉ. वर्षा नेहेते व मप्रदिप कोळी, प्रा. मोहिनी तायडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.पी.ए. सावळे यांनी केले व जागतिक महिला दिन ८ मार्च रोजीच का साजरा करतात या बाबत सविस्तर माहिती दिली. प्रमुख वक्त्या प्रा. मोहिनी तायडे यांनी आपल्या भाषणात महिलांनी त्यांच्यातील सुप्त गुणांना व शक्तिंना जागृत करावे. आजच्या महिलांना सर्व क्षेत्र खुले असून आपल्या आवडीचे क्षेत्र त्यांनी निवडून त्या क्षेत्रात स्वतःला सिद्ध करावे तसेच स्वतःला सिद्ध करण्यासाठी आपल्यात कोणत्या गुणांची आवश्यकता आहे त्याविषयी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महिलांसाठी भारतीय राज्य घटनेने केलेले कायदे त्यांची व्याप्ती, फायदे व तोटे या बद्दल माहिती दिली व त्यांचे उद्बोधन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. मिनाक्षी वाघुळदे तर आभार प्रदर्शन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. दिनेश पाटील यांनी केले. या कार्यक्रमास रासेयो तालुका समन्वयक प्रा. डॉ. आशुतोष वर्डिकर , महाविद्यालयातील प्रा. डॉ. जे. एस. मेढे, प्रा.डॉ. सुनिल नेवे, प्रा. आर.बी. इंगळे, प्रा.एच.टी. इंगळे, प्रा.के.एस. पाटील, प्रा.डी.बी. चौधरी, प्रा.डॉ.व्ही.पी. पवार, प्रा.डॉ.जी.आर. चौधरी, प्रा.राकेश चौधरी, प्रा. सपना नारखेडे, प्रा. मौसमी चौधरी, प्रा. शैलेजा इंगळे, प्रा. योगिता चौधरी, श्री. जीवन झांबरे , श्री. वानखेडे, रासेयोचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. दिनेश महाजन, मुबारक तडवी, तुळशिराम पाटील, श्री. पंकज नेहेते, श्री. बाळकृष्ण चौधरी, कल्याण चौधरी, श्री. चंद्रकांत लोखंडे आदींचे सहकार्य लाभले.

जळगाव
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
जळगाव । रविवार । दि. ३० जानेवारी २०२२ । युगाब्द ५१२३ । वर्ष : २७ । अंक : १७६ । मूल्य ३ रुपये । पृष्ठे ८

# भालोद महाविद्यालयात मतदार दिन साजरा

**फैजपूर** : सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित, कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. के. जी.चौधरी हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुनिल नेवे हे होते. त्यांचे राष्ट्रीय मतदार दिन- लोकशाहीचा जागर ' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले. प्रा. डॉ. सुनिल नेवे यांनी नवमतदारांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली. भारत निवडणूक आयोगाचा स्थापना दिवस हा सन २०११ पासून संपूर्ण देशभरात 'राष्ट्रीय मतदार दिन ' म्हणून साजरा करण्यात येतो. त्यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश हा मतदारांना, विशेषतः नवमतदारांना मतदार यादीत नाव नोंदणीसाठी प्रोत्साहन देणे, नाव नोंदणी करून घेण्याचे आवाहन केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. पी.ए. सावळे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन व आभार रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. मिनाक्षी वाघुळदे यांनी मानले. कार्यक्रमास रासेयो रावेर विभाग समन्वयक प्रा. डॉ.आशुतोष वर्डीकर, प्रा.डॉ. दिनेश पाटील, प्रा.राकेश चौधरी, प्रा.मोहिनी तायडे, मुबारक तडवी आदी उपस्थित होते.








S.E.S'S Art's & Science College
BHALOD
Dist. Jalgaon

Acting Principal
S.E.Society's
Art's & Science College
Bhalod.Dist.Jalgaon.